सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

प्रशासक सभा क्रमांक - ०६/२०२३-२०२४

स्थायी समिती सभा कामकाजाकरिता प्रशासक सभेची नोटीस

ज्या अर्थी, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार विविध कामकाज पार पाडण्यासाठी प्रस्तावित प्रस्तांवाना स्थायी समितीची पुर्व मान्यता देणे आवश्यक आहे आणि,

ज्या अर्थी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ६, ६(अ) मधील तरतुदीनुसार सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका नगरमंडळाची मुदत दि.१९ ऑगस्ट २०२३ रोजी संपुष्टात आलेली असल्याने सद्य:स्थितीत स्थायी समिती अस्तित्वात नाही, आणि,

ज्या अर्थी, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाखाली सर्व अधिकारांचा वापर करण्यासाठी आणि तिची सर्व कामे व कर्तव्ये पार पाडण्यासाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या प्रशासक पदी आयुक्त,सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका यांची दि.२४/०८/२०२३ रोजीचे मा.शासन आदेशान्वये नियुक्ती करण्यात आलेली आहे.

त्या अर्थी, स्थायी समितीच्या मान्यतेने पार पाडावयाचे कामकाज पुर्ण करण्यासाठी प्रशासक यांच्या अध्यक्षतेखाली **मंगळवार दि.०७/११/२०२३ रोजी सकाळी ११.०० वाजता पद्मभूषण डॉ.वसंतरावदादा पाटील सभागृह मुख्यालय, सांगली** येथे सभा आयोजित केली आहे. सदर सभेमध्ये खालील परिशिष्ठातील विषय विचाराधीन आहेत. तरी सदर सभेस सर्व संबंधीत अधिकारी यांनी उपस्थित रहावे.

परिशिष्ठ

१. मागील स्थायी समिती प्रशासक सभा दि.३०/१०/२०२३ रोजीचे कार्यवृत्त वाचून कायम करणे.

२. मिरज पाणी पुरवठा विभागांतर्गत विविध ठिकाणी टाकणेत आलेल्या विविध व्यासाच्या पाईप लाईन व रायझिंग मेन वरील गळती काढण, स्लूस व्हॉल्व बसविणे,क्रॉस कनेक्शन करणे इ.(वॉर्ड क्र.५,६,२० व समतानगर काही परिसर व वॉर्ड क्र.३,४,६ व ७) अंदाजपत्रकीय र.रु.६,४८,३३९/- मात्रचे कामी प्राप्त निविदा मधील सर्वात कमी दराचे निविदाधारक मे.एम.एम.अग्रवाल,मिरज यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.५०% कमी दराने कामगिरी करुन घेणेस व त्याकामी येणारे खर्चास अतिरिक्त आयुक्त आदेश क्र.१०१०४४३१ दि.०४/१०/२०२३ अन्वये मान्यता देणेत आलेली आहे. प्रस्तुत कामगिरीचे इतिवृत्त अवलोकनी घेणेकामी **उपायुक्त (पाणी पुरवठा विभाग) यांचे दि.२७/१०/२०२३ चे विषयपत्र.**

३. मिरज वॉर्ड क्र.०७ अ मराठे मिल झोपडपट्टी जवळ कंपौंड भिंत बांधणे अंदाजपत्रक र.रु.२९,९९,८८४/- मात्रचे कामी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण ५ संविदा खंड २(१) अन्वये रितसर जाहिर निविदा प्रसिद्ध करुन निविदा मागविणेस व त्याकामी येणारे खर्चास मान्यता देणेकामी **उपायुक्त (बांधकाम विभाग) यांचे दि.०१/११/२०२३ चे विषयपत्र.**

४. मिरज वॉर्ड क्र.०७ अ म्हाडा वस्ती सुधारणा करणे अंदाजपत्रक र.रु.२९,९९,०८७/- मात्रचे कामी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण ५ संविदा खंड २(१) अन्वये रितसर जाहिर निविदा प्रसिद्ध करुन निविदा मागविणेस व त्याकामी येणारे खर्चास मान्यता देणेकामी **उपायुक्त (बांधकाम विभाग) यांचे दि.०१/११/२०२३ चे विषयपत्र.**

५. कुपवाड वॉर्ड क्र.८ अष्टविनायकनगर गल्ली क्र.२ ते गंगानगर गल्ली क्र.३ येथील रस्ते हॉटमिक्स डांबरीकरण करणे अंदाजपत्रक र.रु.४१,०८,१२२/- मात्रचे कामी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण ५ संविदा खंड २(१) अन्वये रितसर जाहिर निविदा प्रसिद्ध करुन निविदा मागविणेस व त्याकामी येणारे खर्चास मान्यता देणेकामी **उपायुक्त (बांधकाम विभाग) यांचे दि.०२/११/२०२३ चे विषयपत्र.**

६. सांगली शहर पोलीस ठाणे गुरनं.४४४/२०२० भादवि.क.४२०,४०६,४०९,४६४,४६७,४७१, १२०(ब),३४ चे अनुषंगाने मनपा अधिपत्याखाली स्ट्रीट लाईट विद्युत देयक विभागाचे शासकीय ऑडीट करुन अपहारीत रक्कम व सदर अपहारास जबाबदार असणारे अधिकारी यांची जबाबदारी निश्चित करणेकरीता प्राप्त दरामधील सर्वात कमी दराचे PRASS & ASSOCIATES LLP यांचेकडून करुन घेणेस व त्याकामी येणारे र.रु.२,७५,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देणेकामी **मुख्यलेखापरिक्षक यांचे दि.०३/११/२०२३ चे विषयपत्र.**

७. राष्ट्रीय नदी कृती योजना (NRAP) शेरीनाला व कवलापुर येथील पंपाच्या दुरुस्त्यांसाठी पंपाची कंपनी किशोर पंप यांचेकडून प्राप्त दरानुसार खर्चाच्या ४०% रक्कम + GST १८% प्रमाणे अॅडव्हान्स पोटी र.रु.३०,५८,८८१/- मात्र रक्कम किशोर पंप.चाकण पुणे यांना अदा करणेत आलेले आहेत. प्रस्तुत कामगिरीचे इतिवृत्त अवलोकनी घेणेकामी **उपायुक्त (जलनि:सारण विभाग) यांचे दि.०२/११/२०२३ चे विषयपत्र.**

८. सांगली भुयरी गटार योजना टप्पा क्र.२, भाग-२, हनुमाननगर मलशुद्धीकरण केंद्राच्या देखभाल दुरुस्ती करणेची कामगिरी, सद्याचे ठेकेदार एस.एम.सी.इन्फ्रा. स्ट्रक्चर्स प्रा.लि.ठाणे यांना चालविणेस देणेस व त्यांच्या झाले कामाच्या एकूण रक्कमेच्या ६०% इतकी र.रु.१,६९,०३,८०४/- मात्र आदा करणेस मान्यता देणेकामी **उपायुक्त (जलनि:सारण विभाग) यांचे दि.०२/११/२०२३ चे विषयपत्र.**

९. महानगरपालिकेच्या मुख्य कायदा सल्लागार या पदावर ॲड.सुशिल सुमतीलाल मेहता यांची दि.१४/११/२०२३ पासून दरमहा र.रु.१५,०००/- मात्रचे मानधनावर १ वर्ष कालावधीकरीता मुदतवाढ देणेस मान्यता देणेकामी उपायुक्त **(आस्थापना विभाग) यांचे दि.०३/११/२०२३ चे विषयपत्र.**

१०. वॉर्ड क्र.५ मधील माळी स्मशानभूमी येथे कंपौड भिंत बांधणे अंदाजित र.रु.४३,६२,७३०/- मात्रचे कामी रितसर जाहिर निविदा प्रसिद्ध करुन निविदा मागविणेत आल्या होत्या. विहित मुदतीत प्राप्त निविदा मधील सर्वात कमी दराचे निविदाधारक मुजम्मिल इस्माईल आत्तार,मिरज यांची निविदा र.रु.३६,००,४०७/- मात्र निविदा दरापेक्षा १२.१३% कमी दराने कामगिरी करुन घेणेस व त्याकामी येणारे र.रु.३१,६३,६७७/- मात्रच्या खर्चास मान्यता देणेकामी **उपायुक्त (बांधकाम विभाग) यांचे दि.०१/११/२०२३ चे विषयपत्र.**

११. महानगरपालिका क्षेत्रात NCAP अंतर्गत स्क्रबिंग प्रणाली Outdoor Air Purifier Machine कार्यान्वित करण्यासाठी चार ठिकाणी ५KW क्षमतेचे सोलर पॅनल बसविणे अंदाजपत्रक र.रु.३१,२६,७८४/- मात्रचे कामी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण ५ संविदा खंड २(१) अन्वये रितसर जाहिर निविदा प्रसिद्ध करुन निविदा *मागविणेस व त्याकामी येणारे खर्चास मान्यता* देणेकामी **उपायुक्त (आरोग्य विभाग) यांचे दि.०३/११/२०२३ चे विषयपत्र.**

मा.प्रशासक तथा आयुक्तसो यांचे मान्यतेने

प्र.महापालिका सचिव,
सांगली मिरज आणि कुपवाड शहर
महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

स्थायी समिती प्रशासक सभा क्रमांक :- ०६/२०२३-२४ दिनांक :- ०७/११/२०२३ चे इतिवृत्त

सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिकेची स्थायी समिती प्रशासक सभा क्र.०६ दि.०७/११/२०२३ रोजी महापालिकेच्या पद्मभूषण डॉ.वसंतराव दादा पाटील सभागृह, सांगली येथे सकाळी ११.०० वाजता आयोजित करणेत आलेली होती. सदर प्रशासक स्थायी समिती सभेकरीता खालील अधिकारी उपस्थित होते.

अ. क्र.	उपस्थितांची नावे	अ. क्र.	उपस्थितांची नावे
१.	श्री.सुनिल पवार – प्रशासक	२.	श्री.राहुल रोकडे – उपायुक्त,सांगली
३.	श्री.वैभव साबळे – उपायुक्त	४.	श्री.पृथ्वीराज चव्हाण –शहर अभियंता
५.	श्री.शिरिष धनवे – मुख्य लेखापरिक्षक	६.	श्री.वैभव पाटील - वैद्यकिय आरोग्याधिकारी
७.	श्री.विनय झगडे – स.स.न.र	८.	श्री.राजेंद्र काकडे- नगररचनाकार,मिरज/कुपवाड
९.	श्री.विनायक शिंदे – प्रशासन अधिकारी	१०.	श्री.चिदानंद कुरणे-कार्यकारी अभियंता,पा.पु./जल.वि.सां./मि.
११.	श्री.मानसिंग पाटील - सहा.आयुक्त,प्र.स.क्र.३	१२.	श्री.परमेश्वर हलकुडे - नगर अभियंता,सांगली
१३.	श्री.भगवान पांडव - नगर अभियंता मिरज / ना.दा.नि.कक्ष	१४.	श्री.अमर चव्हाण – विद्युत अभियंता
१५.	श्री.बुचडे – प्रशासन अधिकारी शिक्षण विभाग	१६.	श्री.शंकर भंडारे – ग्रंथपाल,सांगली
१७.	श्री.गिरीष पाठक- उद्यान अधिक्षक	१८.	श्री.नकुल जकाते – सिस्टिम मॅनेजर
१९.	श्री.सुनिल माळी- अग्निशमन अधिकारी	२०.	श्री.विनायक जाधव – ज्यु.इंजि.वर्कशॉप मिरज
२१.	श्री.सुनिल पाटील - विशेष कार्यकारी अधिकारी,पा.पु.वि.	२२.	श्री.जेलर – क्रिडा अधिकारी
२३.	श्री.गुजराथी– पर्यावरण अभियंता, आरोग्य विभाग	२४.	श्री.किल्लेदार – घनकचरा प्रकल्प अधिकारी

महापालिका सचिव यांनी सभेच्या सुरुवातीला मा.प्रशासक व सर्व अधिकारी यांचे स्वागत करुन, सभेच्या कामकाजास मा.प्रशासक यांच्या आदेशाने सुरुवात केली.

विषय क्र. ०१ मागील स्थायी समिती प्रशासक सभा दि.३०/१०/२०२३ रोजीचे कार्यवृत्त वाचून कायम करणे.

प्रशासक मागील सभेतील कार्यवृत्त कायम करणेत येत आहे.

विषय क्र. ०२ मिरज पाणी पुरवठा विभागांतर्गत विविध ठिकाणी टाकणेत आलेल्या विविध व्यासाच्या पाईप लाईन व रायझिंग मेन वरील गळती काढण, स्लूस व्हॉल्व बसविणे,क्रॉस कनेक्शन करणे कामगिरीचे इतिवृत्त अवलोकनी घेणे

प्रशासक खर्च रक्कम किती आहे.

पाणी पुरवठा अभियंता ६,४८,३३९/- खर्च आहे.

प्रशासक विषय मंजूर

विषय क्र. ०३	मिरज वॉर्ड क्र.०७ अ मराठे मिल झोपडपट्टी जवळ कंपौंड भिंत बांधणे अंदाजपत्रक र.रु.२९,९९,८८४/- मात्रचे कामी निविदा मागविणेस व त्याकामी येणारे खर्चास मान्यता देणे.
प्रशासक	निधी कुठला आहे.
शहर अभियंता	५% समाज कल्याण निधी आहे.
प्रशासक	कंपौंड किती लांबी आहे.
शहर अभियंता	२१० मी.कंपौड आहे. पाईल मारुन विट बांधकाम असून, शेजारी असणाऱ्या नाल्यास लागून कंपौंड भिंत होणार आहे.
प्रशासक	विषय मंजूर
विषय क्र. ०४	मिरज वॉर्ड क्र.०७ अ म्हाडा वस्ती सुधारणा करणे अंदाजपत्रक र.रु.२९,९९,०८७/- मात्रचे कामी निविदा मागविणेस व त्याकामी येणारे खर्चास मान्यता देणे
प्रशासक	विषय मंजूर
विषय क्र. ०५	कुपवाड वॉर्ड क्र.८ अष्टविनायकनगर गल्ली क्र.२ ते गंगानगर गल्ली क्र.३ येथील रस्ते हॉटमिक्स डांबरीकरण करणे अंदाजपत्रक र.रु.४१,०८,१२२/- मात्रचे कामी निविदा मागविणेस व त्याकामी येणारे खर्चास मान्यता देणे.
प्रशासक	विषय मंजूर
विषय क्र. ०६	स्ट्रीट लाईट विद्युत देयक विभागाचे शासकीय ऑडीट करणेसाठी कमी दराचे PRASS & ASSOCIATES LLP यांचेकडून करुन घेणेस मान्यता देणे.
प्रशासक	ऑडिटर यांना सर्व कागदपत्रे उपलब्ध करुन दयावीत.
विद्युत अभियंता	त्यामध्ये इतर विभागाची बिले दिलेली आहेत व काही बिलांची अर्धवट झेरॉक्ट अकौंट विभागाने दिलेली आहे.
प्रशासक	विषय मंजूर
विषय क्र. ०७	राष्ट्रीय नदी कृती योजना (NRAP) शेरीनाला व कवलापुर येथील पंपाच्या दुरुस्त्यांसाठी पंपाची कंपनी किशोर पंप यांना रक्कम अदा करणेत आलेले आहेत. त्यास मान्यता देणे.
पाणी पुरवठा अभियंता	पंप नादुरुस्त झालेने तातडीने दुरुस्त करुन घेणे आवश्यक होते. उत्पादक कंपनीकडून दुरुस्त करुन घेणेसाठी ४०% ॲडव्हॉन्स रक्कम आदा करणेत आलेली आहे.त्यास मान्यता देणे.
प्रशासक	अत्यावश्यक व तातडीची बाब असलेने विषय मंजूर

विषय क्र. ०८	सांगली भुयरी गटार योजना टप्पा क्र.२, भाग-२, हनुमाननगर मलशुद्धीकरण केंद्राच्या देखभाल दुरुस्ती करणेची कामगिरी, सद्याचे ठेकेदार एस.एम.सी.इन्फ्रा. स्ट्रक्चर्स प्रा.लि.ठाणे यांना चालविणेस देणेस व त्यांच्या झाले कामाच्या एकुण रक्कमेच्या ६०% इतकी र.रु.१,६९,०३,८०४/- मात्र आदा करणेस मान्यता देणे
प्रशासक	माहिती दया
पाणी पुरवठा अभियंता	मलशुद्धीकरण केंद्राचे देखभाल दुरुस्तीचे काम ठेकेदाराने केलेले आहे. त्याचे बिल ६०% रक्कम आदा करणेची आहे. मजिप्रा कडून त्याबाबत स्पष्टीकरण घेणेत आलेले आहे. तसेच यापुढील कालावधीसाठी ठेकेदार नियुक्त करणेचा असून, दरम्यान नविन ठेकदार नियुक्त होईतोपर्यत सद्याचे ठेकेदाराकडून देखभाल दुरुस्तीचे काम करुन घेणेचे आहे.
प्रशासक	तात्काळ निविदा प्रक्रिया राबवावी विषय मंजूर
विषय क्र. ०९	महानगरपालिकेच्या मुख्य कायदा सल्लागार या पदावर ॲड.सुशिल सुमतीलाल मेहता यांची दि.१४/११/२०२३ पासून दरमहा र.रु.१५,०००/- मात्रचे मानधनावर १ वर्ष कालावधीकरीता मुदतवाढ देणे.
आस्थापना अधिकारी	मुख्य कायदा सल्लागार यांची मुदत संपणार असलेने त्यांना १ वर्ष मुदतवाढ देणेची आहे.
प्रशासक	मुख्य कायदा सल्लागार पदासाठी इतर कोणाचे अर्ज आहेत. चंद्रशेखर कुलकर्णी यांचा अर्ज आलेला आहे का?
आस्थापना अधिकारी	माहिती घेवून सांगतो.
प्रशासक	मुख्य कायदा सल्लागार पदासाठी पात्रतेच्या अटी काय आहेत.
उपायुक्त	१० वर्ष न्यायालयात प्रॅक्टीस हवी व मनपा पॅनल वर असावेत.
प्रशासक	विषय मंजूर
विषय क्र. १०	वॉर्ड क्र.५ मधील माळी स्मशानभूमी येथे कंपौड भिंत बांधणे अंदाजित र.रु.४३,६२,७३०/- मात्रचे कामी निविदा दरास मान्यता देणे.
प्रशासक	विषय मंजूर
विषय क्र. ११	महानगरपालिका क्षेत्रात NCAP अंतर्गत स्क्रबिंग प्रणाली Outdoor Air Purifier Machine कार्यान्वित करण्यासाठी चार ठिकाणी ५KW क्षमतेचे सोलर पॅनल बसविणे निविदा मागविणेस व त्याकामी येणारे खर्चास मान्यता देणे
प्रशासक	विषय मंजूर

येणेप्रमाणे सभेचे कामकाज पुर्ण झाल्यानंतर मा.प्रशासक यांनी सभा संपलेचे जाहिर केले.

दिनांक :- ०७/११/२०२३

(सुनिल पवार)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

स्थायी समिती प्रशासक सभा क्रमांक :- ०६/२०२३-२४

स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक :- ४८ **दिनांक :- ०७/११/२०२३**

विषय क्रमांक :- ०१

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकारांचा वापर करुन,

मागील स्थायी समिती प्रशासक सभा दि.३०/१०/२०२३ रोजीच्या कार्यवृत्तातील ठराव क्र. ४२ ते ठराव क्र.४७ हे वाचून दाखविण्यात आले. सदरचे कार्यवृत्त वाचून ही सभा सर्वानुमते कायम करीत आहे.

(सुनिल पवार)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

स्थायी समिती प्रशासक सभा क्रमांक :- ०६/२०२३-२४

स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक :- ४९ **दिनांक :-** ०७/११/२०२३

विषय क्रमांक :- ०२

सोबतचे उपायुक्त (पाणी पुरवठा विभाग) यांचे दि.२७/१०/२०२३ चे विषयपत्राचे अवलोकन करणेत आले.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकारांचा वापर करुन,

मिरज पाणी पुरवठा विभागांतर्गत विविध ठिकाणी टाकणेत आलेल्या विविध व्यासाच्या पाईप लाईन व रायझिंग मेन वरील गळती काढणे, स्लूस व्हॉल्व बसविणे,क्रॉस कनेक्शन करणे इ.(वॉर्ड क्र.५,६,२० व समतानगर काही परिसर व वॉर्ड क्र.३,४,६ व ७) अंदाजपत्रकीय र.रु.६,४८,३३९/- मात्रचे कामी प्राप्त निविदा मधील सर्वात कमी दराचे निविदाधारक मे.एम.एम.अग्रवाल,मिरज यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.५०% कमी दराने कामगिरी करुन घेणेस व त्याकामी येणारे खर्चास अतिरिक्त आयुक्त आदेश क्र.१०१०४४३१ दि.०४/१०/२०२३ अन्वये मान्यता देणेत आलेली आहे. प्रस्तुत कामगिरीचे इतिवृत्त अवलोकनी घेवून परत पाठविणेत येत आहे.

(सुनिल पवार)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

पाणीपुरवठा अभियंता

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

स्थायी समिती प्रशासक सभा क्रमांक :- ०६/२०२३-२४

स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक :- ५० **दिनांक :- ०७/११/२०२३**

विषय क्रमांक :- ०३

सोबतचे उपायुक्त (बांधकाम विभाग) यांचे दि.०१/११/२०२३ चे विषयपत्राचे अवलोकन करणेत आले.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकारांचा वापर करुन,

मिरज वॉर्ड क्र.०७ अ मराठे मिल झोपडपट्टी जवळ कंपौंड भिंत बांधणे अंदाजपत्रक र.रु.२९,९९,८८४/- मात्रचे कामी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण ५ संविदा खंड २(१) अन्वये रितसर जाहिर निविदा प्रसिद्ध करुन निविदा मागविणेस व त्याकामी येणारे खर्चास विषयपत्रातील शिफारशीनुसार मान्यता देणेत येत आहे.

उक्त कामी येणारा खर्च विषयपत्रातील नमुद अर्थसंकल्पीय तरतुदी मधून होणेचा आहे.

(सुनिल पवार)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

स्थायी समिती प्रशासक सभा क्रमांक :- ०६/२०२३-२४

स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक :- ५१ **दिनांक :- ०७/११/२०२३**

विषय क्रमांक :- ०४

सोबतचे उपायुक्त (बांधकाम विभाग) यांचे दि.०१/११/२०२३ चे विषयपत्राचे अवलोकन करणेत आले.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकारांचा वापर करुन,

मिरज वॉर्ड क्र.०७ अ म्हाडा वस्ती सुधारणा करणे अंदाजपत्रक र.रु.२९,९९,०८७/- मात्रचे कामी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण ५ संविदा खंड २(१) अन्वये रितसर जाहिर निविदा प्रसिद्ध करुन निविदा मागविणेस व त्याकामी येणारे खर्चास विषयपत्रातील शिफारशीनुसार मान्यता देणेत येत आहे.

उक्त कामी येणारा खर्च विषयपत्रातील नमुद अर्थसंकल्पीय तरतुदी मधून होणेचा आहे.

(सुनिल पवार)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

स्थायी समिती प्रशासक सभा क्रमांक :- ०६/२०२३-२४

स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक :- ५२ **दिनांक** :- ०७/११/२०२३

विषय क्रमांक :- ०५

सोबतचे उपायुक्त (बांधकाम विभाग) यांचे दि.०२/११/२०२३ चे विषयपत्राचे अवलोकन करणेत आले.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकारांचा वापर करुन,

कुपवाड वॉर्ड क्र.८ अष्टविनायकनगर गल्ली क्र.२ ते गंगानगर गल्ली क्र.३ येथील रस्ते हॉटमिक्स डांबरीकरण करणे अंदाजपत्रक र.रु.४१,०८,१२२/- मात्रचे कामी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण ५ संविदा खंड २(१) अन्वये रितसर जाहिर निविदा प्रसिद्ध करुन निविदा मागविणेस व त्याकामी येणारे खर्चास विषयपत्रातील शिफारशीनुसार मान्यता देणेत येत आहे.

उक्त कामी येणारा खर्च विषयपत्रातील नमुद अर्थसंकल्पीय तरतुदी मधून होणेचा आहे.

(सुनिल पवार)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

स्थायी समिती प्रशासक सभा क्रमांक :- ०६/२०२३-२४

स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक :- ५३ **दिनांक :- ०७/११/२०२३**

विषय क्रमांक :- ०६

सोबतचे मुख्यलेखापरिक्षक यांचे दि.०३/११/२०२३ चे विषयपत्राचे अवलोकन करणेत आले.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकारांचा वापर करुन,

सांगली शहर पोलीस ठाणे गुरनं.४४४/२०२० भादवि.क.४२०,४०६,४०९,४६४,४६७,४७१, १२०(ब),३४ चे अनुषंगाने मनपा अधिपत्याखाली स्ट्रीट लाईट विद्युत देयक विभागाचे शासकीय फॉरेन्सीक ऑडीट होवून, अपहारीत रक्कम व सदर अपहारास जबाबदार असणारे अधिकारी यांची जबाबदारी निश्चित करणेकरीता ऑडीटर व डिजिटल फॉरेन्सीक ऑडीटर संस्थेकडून ऑडिट अहवाल तपासणेसाठी महाराष्ट्र शासन निर्णय दि.०८ एप्रिल २०२० च्या शासन निर्णयामधील आर्थिक गैरव्यवहारातील गुन्हाचा तपास करणेकामी फॉरेन्सीक ऑडिटर व डिजिटल फॉरेन्सीक ऑडीटर संस्थांच्या सूचीमधील सर्वात कमी दराचे PRASS & ASSOCIATES LLP यांचेकडून करुन घेणेस व त्याकामी येणारे र.रु.२,७५,०००/- मात्रचे खर्चास विषयपत्रातील शिफारशीनुसार मान्यता देणेत येत आहे.

(सुनिल पवार)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

मुख्यलेखापरिक्षक

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

स्थायी समिती प्रशासक सभा क्रमांक :- ०६/२०२३-२४

स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक :- ५४ **दिनांक :-** ०७/११/२०२३

विषय क्रमांक :- ०७

सोबतचे उपायुक्त (जलनि:सारण विभाग) यांचे दि.०२/११/२०२३ चे विषयपत्राचे अवलोकन करणेत आले.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकारांचा वापर करुन,

राष्ट्रीय नदी कृती योजना (NRAP) शेरीनाला व कवलापुर येथील अनुक्रमे ३०० अश्वशक्तीचे दोन नग व २०० अश्वशक्तीचा एक पंप नादुरुस्त झालेने, सदर पंपाची दुरुस्ती कामाची निकड व प्रदुषण नियंत्रण करणेकामी तातडीने करुन घेणे आवश्यक असलेने, अत्यावश्यक बाब म्हणून सदर पंपाची उत्पादक कंपनी किशोर पंप यांचेकडून दुरुस्तीसाठी प्राप्त दरानुसार दुरुस्त करुन घेणेस व दुरुस्ती खर्चाच्या ४०% रक्कम + GST १८% प्रमाणे ॲडव्हान्स पोटी र.रु.३०,५८,८८१/- मात्र रक्कम किशोर पंप,चाकण पुणे यांना अदा करणेच्या कामगिरीस नदी प्रदुषण रोखणेसाठीची अत्यावश्यक बाब म्हणून कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

(सुनिल पवार)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

जलनि.सा.उपअभियंता

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

स्थायी समिती प्रशासक सभा क्रमांक :- ०६/२०२३-२४

स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक :- ५५ **दिनांक :-** ०७/११/२०२३

विषय क्रमांक :- ०८

सोबतचे उपायुक्त (जलनि:सारण विभाग) यांचे दि.०२/११/२०२३ चे विषयपत्राचे अवलोकन करणेत आले.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकारांचा वापर करुन,

सांगली भुयारी गटार योजना टप्पा क्र.२, भाग-२, या योजनेचे कंत्राट महापालिकेने ठेकेदार एस.एम.सी.इन्फ्रा. स्ट्रक्चर्स प्रा.लि.ठाणे यांना दिलेले आहे व सदर योजनेकरीता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण हे प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार आहेत. हनुमाननगर मलशुद्धीकरण केंद्राच्या देखभाल दुरुस्तीचा प्रस्ताव मजिप्रा कडून सादर करणेत आलेला होता. त्यास अनुसरुन निविदेनुसार एक वर्षाचा कालावधी पुर्ण झाल्यावर महापालिकेकडून ठेकेदारास देखभाल दुरुस्ती व मलशुद्धीकरण केंद्र चालविणेचा खर्च देणे आवश्यक असल्याने, त्यानुसार र.रु.२,८१,७३,००७/- मात्रचा प्रस्ताव प्रशासनाकडून अतिरिक्त बाब म्हणून सादर करणेत आलेला होता. त्यावर मुख्यलेखाधिकारी यांनी सहा मुद्दे उपस्थित केलेले होते. त्यास अनुसरुन मजिप्रा कडून शे-यांची पुर्तता व मुद्दयांचे स्पष्टीकरण देणेत आलेले आहे. त्यानुसार हनुमाननगर मलशुद्दीकरण केंद्रामधील काही युनिटच्या दुरुस्त्यांचे काम पुर्ण करणे गरजेचे असून, सदरचे काम लवकरात लवकर पूर्ण करणेत यावे व काम पूर्ण होईतोपर्यत प्रस्तावातील ४०% मागे ठेवूनृ उर्वरित ६०% इतकी र.रु.१,६९,०३,८०४/- मात्र रक्कम ठेकेदारास आदा करणेस मान्यता देणेत येत असून, सदरचे मलशुद्धीकरण केंद्र चालविणेसाठी महापालिकेकडे तांत्रिक दृष्ट्या सक्षम मनुष्यबळ नसल्यामुळे मलशुद्धीकरण चालविणेसाठी ठेकेदार नियुक्तीकामी महा ई-टेंडरद्वारे निविदा मागविणे व निविदा प्रक्रिया पुर्ण होईतोपर्यत हनुमान नगर मलशुद्धीकरण व कोल्हापूर रोड पंपींग स्टेशन केंद्राची देखभाल दुरुस्ती करणेची कामगिरी सद्याचे ठेकेदार यांचेकडून करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

उक्त कामी येणारा खर्च विषयपत्रातील नमुद अर्थसंकल्पीय तरतुदी मधून होणेचा आहे.

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

(सुनिल पवार)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

स्थायी समिती प्रशासक सभा क्रमांक :- ०६/२०२३-२४

स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक :- ५६ **दिनांक :-** ०७/११/२०२३

विषय क्रमांक :- ०९

सोबतचे उपायुक्त (आस्थापना विभाग) यांचे दि.०३/११/२०२३ चे विषयपत्राचे अवलोकन करणेत आले.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकारांचा वापर करुन,

महानगरपालिकेच्या मुख्य कायदा सल्लागार या पदावर ॲड.सुशिल सुमतीलाल मेहता यांची मा.स्थायी समितीच्या मान्यतेने एक वर्ष कालावधीकरीता दरमहा र.रु.१५,०००/- मात्रचे मानधनावर नियुक्ती करणेत आलेली होती. त्यांची मुदत दि.१४/११/२०२३ रोजी संपणार असून, त्यांना दि.१५/११/२०२३ पासून दरमहा र.रु.१५,०००/- मात्रचे मानधनावर १ वर्ष कालावधीकरीता मुदतवाढ देणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार मान्यता देणेत येत आहे.

(सुमित पवार)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

स्थायी समिती प्रशासक सभा क्रमांक :- ०६/२०२३-२४

स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक :- ५८ **दिनांक :-** ०७/११/२०२३

विषय क्रमांक :- ११

सोबतचे उपायुक्त (आरोग्य विभाग) यांचे दि.०३/११/२०२३ चे विषयपत्राचे अवलोकन करणेत आले.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकारांचा वापर करुन,

महानगरपालिका क्षेत्रात NCAP अंतर्गत स्क्रबिंग प्रणाली Outdoor Air Purifier Machine कार्यान्वित करण्यासाठी चार ठिकाणी ५KW क्षमतेचे सोलर पॅनल बसविणे अंदाजपत्रक र.रु.३१,२६,७८४/- मात्रचे कामी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण ५ संविदा खंड २(१) अन्वये रितसर जाहिर निविदा प्रसिद्ध करुन निविदा मागविणेस व त्याकामी येणारे खर्चास विषयपत्रातील शिफारशीनुसार मान्यता देणेत येत आहे.

उक्त कामी येणारा खर्च विषयपत्रातील नमुद अर्थसंकल्पीय तरतुदी मधून होणेचा आहे.

(सुनिल पवार)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका